शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा. क्र. विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/३३७८ दिनांक १३/०८/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/372
दि. 22 AUG 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/३३७८ दिनांक : १३/०८/२०१९

प्रति,

१.कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,

२.प्राचार्य,

सर्व शासकीय,अशासकीय,अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**विषय:- केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरून महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ :- संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/१०३६८/दि.३/०८/२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे त्याप्रमाणे आपल्याशी निगडीत बाबींचा विचार करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

सोबत :-संचालनालयाकडील संदर्भिय पत्र

प्रत :- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,पुणे-०१

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत/ शिष्यवृत्ती / 10368 दिनांक- ०३.०८.२०१९.

- 3 AUG 2019

अत्यंत महत्वाचे

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

विषय- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत.

संदर्भ- अल्पसंख्याक कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे दि.०५.०७.२०१९ नुसार सन २०१९-२० साठी National Scholarship Portal वर करावयाच्या कार्यवाहीबाबत .

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती National Scholaship Portal व संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सर्व महाविद्यालय / संस्था यांना त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने AISHE / U-DISE/ NCVT / SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुनर्नोंदणी करणेबाबत संचालनालयाचे दि. २०.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे.

परंतु काही वरिष्ठ महाविद्यालयांना कनिष्ठ महाविद्यालये संलग्नित आहेत ,अशा महाविद्यालयानी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयासाठी वेगळा युजर आयडी व पासवर्ड वापरणे आवश्यक आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा वेगळा User Id व Passward नसल्यास अशा महाविद्यालयाची NSP Portal वर नव्याने नोंदणी करण्यासाठी संचालनालयाकडून User Id व Passward घेणे आवश्यक आहे. नव्याने नोंदणी करणेसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या विहित विवरण पत्रातील माहिती भरुन संचालनालयाच्या scholarshippms@gmail.com या ई-मेल वर पाठविणे आवश्यक आहे. नविन User Id व Passward प्राप्त झाल्यानंतर दि.२०.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार पुर्ननोंदणीबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच संबंधित महाविद्यालयांनी लॉगिन करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना नोडल अधिका-याचे आधार कार्ड /पॅन कार्ड / वाहन परवाना Upload करावा. तसेच ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जावर संस्थेच्या नोडल अधिका-याचा फोटो लावावा. ऑनलाईन अर्जाच्या प्रति सोबत संस्थेच्या नोडल अधिका-याचे Upload केलेले ओळखपत्र , AISHE / U-DISE/ NCVT / SCVT CODE च्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी .

उच्च शिक्षण संचालनालयाकडून (State Nodal Officer) मंजूरी मिळाल्यानंतर संस्थाच्या Nodal Officer यांच्या मोबाईल नंबरवर User Id व Passward प्राप्त होणार आहे.

तसेच कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रासह शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे -०१ ,(शिष्यवृत्ती शाखा) येथे कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता ११ वी ,१२ वी फक्त) / वरिष्ठ महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र)अध्यापक महाविद्यालये (डी.टी.ई.डी),आयटीआय ,पॉलिटेक्निक, नर्सिंग इत्यादि अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना समक्ष उपस्थित रहाणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

महाविद्यालय/ संस्था यांनी विहित कालमर्यादेत NSP पोर्टलवर पुननोंदणी न केल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय / संस्था यांची राहिल याची नोंद घ्यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -०१

प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,

आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दि.२९.०८.२०१९ पूर्वी याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार,मुंबई
३. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा,पुणे.
५. कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,म्हसरुळ,वणी ,दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
६. कुलसचिव,महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक,नागपूर ४४० ००१
७. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-
- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.